। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ३५ वा । गुरूवार दिनांक ०९ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# सामाजिक समता सप्ताहाची दमदार सुरुवात

## महापुरुषांच्या विचारांची बांधिलकी जपण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

धाराशिव (जिमाका) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यात सामाजिक समता सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.या सप्ताहाच्या निमित्ताने शासकीयस्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम,शिबिरे व विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाचे आज ८ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर,जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त बलभीम शिंदे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने,इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अमोल ताकभाते यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की,महापुरुषांच्या विचारांची बांधिलकी जपणे व पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यांनी भारतीय संविधान निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान आणि मूलभूत हक्कांविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच डॉ.आंबेडकर यांनी केलेल्या विविध चळवळी व सत्याग्रहांची माहिती देत सामाजिक समता सप्ताहाचे महत्त्व पटवून दिले.

या सामाजिक समता सप्ताहामध्ये 'स्वाधार योजना व इतर शासकीय योजनांचे लाभ' या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार असून, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच स्वच्छता अभियान राबवून समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे.यासोबतच रक्तदान शिबिर,जयंती उत्सव,विविध स्पर्धा, सामाजिक समता रथाद्वारे प्रबोधन आणि विविध विषयांवरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा महाडदळकर यांनीही सामाजिक समता सप्ताहानिमित्त उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी आकांक्षा कोकाटे,दीक्षा भालशंकर,मोनिका गवळी व वैष्णवी माने या




विद्यार्थिनींना जात पडताळणी प्रमाणपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त शंकर काशिनाथ खुने, विजयकुमार गायकवाड,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त सुधाकर सगट,कैलास पवार आणि संत रोहीदास चर्मकार समाज भुषण पुरस्कार प्राप्त भैरवनाथ कानडे यांचा संविधानाची फ्रेम देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक आयुक्त समाज कल्याण सचिन कवले यांनी केले. सामाजिक समता सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

व्याख्याते व साहित्यिक भैरवनाथ कानडे आणि महेंद्र चंदनशिवे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आधुनिक भारत या विषयावर व्याख्यान दिले.या कार्यक्रमास विद्यार्थी,विविध संघटनांचे पदाधिकारी,पत्रकार बांधव तसेच अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्राईम न्युज

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दयानंद रा.येणेगुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.०७.०४.२०२६ रोजी येणेगुर येथे एनएच६५रोडचे कडेला महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा विमल पान मसाला, व व्ही-१ टोबॅको असा एकुण ३,७५० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला मुरुम पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या. सं. कलम-२२३, २७४, २७५ अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## सोलार प्लॅन्टच्या स्टॅन्डवरील लावलेल्या १३ प्लेटाची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : फिर्यादी वंदना रविकांत उमरदंड, वय ५३ वर्षे, रा. तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव, ह.मु. अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि. बीड यांचे तेरखेडा ता. वाशी शिवारातील शेत गट नं २५९ मधील सोलार प्लॅन्टच्या स्टॅन्डवरील लावलेल्या १३ प्लेटा एकुण २,२०,००० किंमतीचा माल दि.०३.०४.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- वंदना उमरदंड यांनी दि.०६.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## आमराई परिसरातून महत्वाचे कागदे व रोख रक्कमेची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- विशाल निळकंठ बारकुल, वय ३६ वर्षे, रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव हे दि. ०४.०४.२०२६ रोज येडेश्वरी देवीच्या यात्रे मध्ये आमराई परिसर येथे त्यांची कार लावून कारमध्ये ग्राम पंचायत कार्यालयाचे महत्वाचे कागदे व रोख रक्कम ९५,००० ठेवून सदरची कार लॉक करुन पाळण्याजवळ गेले असता कार मधील ९५,००० रोख रक्कम ही अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. कारचे दरवाजाचे लॉक तोडून ३,००० नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विशाल बारकुल यांनी दि.०५.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५(२), ३२४(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोटारसायकल चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमोल व्यंकट गायकवाड, वय ३५ वर्षे, रा. औराद ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे २५,००० किंमतीची हिरो कंपनीची मोटरसायकल ही दि. ०४.०४.२०२६ रोजी ११.३० कानडे हॉस्पीटल उमरगा येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल गायकवाड यांनी दि.०७.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथ गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

# १३०० घरांतील धान्यांपासून बनवल्या घुगऱ्या; लाखभर भाविकांना प्रसाद

## येडाई देवी यात्रेच्या सांगतेला घुगऱ्याची पहाटेपासून तयारी, गावकरी देतात शेतात पिकलेले धान्य



**धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-** तुळजाभवानी मातेची धाकटी बहीण असलेल्या येरमाळ्यातील श्री येडेश्वरी देवीव्या यात्रेची सांगता मंगळवारी अमराईतून पालखी मंदिरात येऊन झाली. यात्रेत शेवटच्या दिवशी येरमाळ्यातील प्रत्येक घरातून म्हणजे १३०० घरांतून आणलेल्या धान्यापासून बनवलेल्या घुगऱ्यांचा प्रसाद एक लाखाहून अधिक भाविकांनी घेतला.

या घुगऱ्यांच्या प्रसादासाठी गावकरी आपल्या शेतामध्ये पिकलेल्या धान्याबरोबरच काजू, बदाम यासारखे ड्रायफ्रूटही देतात. हा प्रसाद काहिलीमध्ये बनवला जातो. यात्रेच्या पहिल्या दिवशी देवी मुख्य मंदिरातून अमराईमध्ये जाते. तेथे देवीचा चार दिवस मुक्काम असतो. दरम्यान अमराईत चुनखडी वेचण्यासाठी १५ लाखाहून अधिक भाविक आले होते.

यात्रेच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी लाखाहून अधिक भाविकांनी घुगऱ्याचा प्रसाद घेतला. घुगऱ्यांमध्ये ज्वारी, गहू, हरभरा, शेंगदाणे, साखर, काजू, मणुके, बदाम, गूळ, श्रीफळ आदींचा समावेश असतो. गावातील उबंरदंड कुटुबीय हे सर्व गावकऱ्यांकडून जमा करून महाप्रसाद बनवतात.

जोंवरी तोंवरी शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ।।१।।. जोंवरी तोंवरी शोभती दीपिका । नुगवता एका भास्करासी ।।३।।. जोंवरी तोंवरी सांगती संतपणाचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुकयासवें खख मातेविण बाळा । आणिक न माने सोहळा ।।या तुकारामांच्या अभंगाच्या अभंगा नुसार येरमाळा येथील श्री येडेश्र्वरी देवी चैत्र महोत्सव सुरू असून देवीची पालखी अमराई मंदिरामध्ये चार दिवस मुक्कामी असल्याने विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह मनोरंजनाची साधने तसेच खाऊ गल्ली अशा अनेक प्रकारच्या साधनांची दुकाने थाटली गेली आहेत या यात्रा महोत्सांमध्ये दाखल आहेत यामध्ये रहाट पाळणे ब्रेक डान्स उंच उडी, राऊंड नाव मौत का कुवा असे स्टॉल होते.

देवी पाच दिवस अमराईतील मंदिरात मुक्कामी असते. या पाच दिवसात भाविक देवीसाठी पुरणपोळी, दहीभात, लाह्या, बत्ताशे, रेवडी, फुटाण्याचा नैवेद्य दाखवतात. श्रीफळ वाढवून आराधना केली जाते.

# कलियुगात नाम चिंतन भगवंत भक्तीचे सोपे माध्यम-बारस्कर महाराजांचे किर्तन



परंडा(प्रतिनिधी)-कलियुगात सगळ्यात सोपे व साधे माध्यम नाम चिंतन हे आहे. भगवंतांच्या नामस्मरणाने आपल्यातील भवरोग नाहीसे होतात, असे प्रतिपादन मारुती महाराज बारस्कर यांनी संत बाळूमामा मंदिर येथील अखंड हरिनाम सप्ताहातील पहिले पुष्प अर्पण करताना केले. परंड्यातील श्री संत बाळूमामा मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ सकाळी महंत पीरयोगी शामनाथ जी महाराज यांच्या हस्ते कलशपूजनाने झाला. या वेळी ग्रंथ पूजन जिल्हाप्रमुख दत्तात्रेय साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. वीणापूजन भागवताचार्य दत्तात्रय महाराज हुके यांच्या तर ग्रंथपूजन नवनाथ महाराज साठे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमापूजन बालाजी महाराज बोराडे, भाग्यवंत महाराज रोडगे यांच्या हस्ते झाले. सकाळी ९ ते १० वेळेमध्ये संत बाळूमामा विजय ग्रंथ पारायण संपन्न झाले. त्यानंतर श्री संत बाळूमामा महिला भजनी मंडळ परंडा व श्री संत सावता माळी भजनी मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दुपारी ब्रम्हांडनायक संत बाळूमामा चरित्र कथा सुभाष महाराज म्हैत्रे व मारुती महाराज जाधव यांची संपन्न झाली.

दुपारचा महाप्रसाद एसबी उद्योग समूह संजय बोराडे, प्रमोद बोराडे, धनाजी बोराडे, शुभम बोराडे यांच्या वतीने संपन्न झाला. रात्री ७ ते ९ या वेळेमध्ये मारुती महाराज बारस्कर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी नाना महाराज गुटाळ, पांडुरंग महाराज शेळके, सुमित महाराज कठारे, कानिफ महाराज गोरे, हनुमंत महाराज ऐतवाडे, बळीराम महाराज कोळी आदी उपस्थित होते.

भजनात भाविक झाले दंग, महाप्रसादाने तृप्त भाविक भक्तांना नारायण महाराज माळी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादनंतर सोनगिरी खासगाव रुई भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन संत बाळूमामा मंदिर समितीच्या वतीने केशरताई वैरागे मदने यांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी हभप बालाजी महाराज बोराडे, हभप नागेश महाराज मांजरे, हभप शहाजी महाराज सुतार, तात्या महाराज चव्हाण, नवनाथ महाराज गोडगे, आश्रब महाराज माने आदी उपस्थित होते.

# ज्वारी, गहू, हरभरा अन् फळबागांना फटका; शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

लोहारा (प्रतिनिधी)- लोहारा शहर व तालुक्यातील बहुतांश ठिकाणी वाऱ्यासह गारपीट झाली. या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे गहू, ज्वारी, हरभरा, केळी, कलिंगड, द्राक्षे, कांदा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अजूनही अधूनमधून अवकाळी पाऊस सुरूच आहे. या नुकसानीची भरपाई शासन कधी देणार, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

पुढील तीन दिवस वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज १५ मार्च रोजी हवामान खात्याने वर्तवला होता. त्यानंतर १७ मार्च रोजी सायंकाळी अचानक वातावरणात बदल झाला. ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि सायंकाळी सुमारे पावणे सहाच्या दरम्यान वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच गारपीट सुरू झाली. ही गारपीट काही ठिकाणी पंधरा मिनिटे, तर काही ठिकाणी अर्धा तास चालली. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

तालुक्यातील राजेगाव येथे सायंकाळी चारच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यानंतर काही वेळात गारपीट झाली. या अवकाळी पावसामुळे हरभरा, गहू, ज्वारी, आंबा, द्राक्षे, केळी आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रात्री आठ वाजेपर्यंत कमी-अधिक प्रमाणात पाऊस सुरूच होता. लोहारा शहरासह एकोंडी, राजेगाव, चिंचोली (रेबे), लोहारा खुर्द, खेड, हराळी, आष्टाकासार, भोसगा, अचलेर, जेवळी, माकणी, सास्तूर, कास्ती, नागूर, कानेगाव आदी अनेक ठिकाणी हा अवकाळी पाऊस झाला.

या अवकाळी पावसामुळे लोहारा खुर्द येथील काही शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेला कांदा खराब झाला. तसेच काहींच्या केळीच्या बागांचे नुकसान झाले. अनेकांच्या आंब्याच्या बागांनाही मोठा फटका बसला. याशिवाय कलिंगड व द्राक्ष बागांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. याच पार्श्वभूमीवर १८ मार्च रोजी पंचनाम्याच्या कामास सुरुवात झाली. मात्र १९ मार्च रोजी पुन्हा एकदा तालुक्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाला, त्यामुळे शेतकरी आणखी संकटात सापडला. दुपारी चारच्या सुमारास सास्तूर, एकोंडी, राजेगाव व परिसरात पुन्हा पावसाने हजेरी लावली. सास्तूर व परिसरात जवळपास पंधरा मिनिटे गारपीट झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. एक दिवसाआड झालेल्या या दोन अवकाळी पावसांमुळे ज्वारी, गहू, हरभरा, कांदा तसेच द्राक्षे, आंबा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पंचनाम्याचे काम सुरू आहे : एकूणच, अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत पंचनाम्याचे काम तात्काळ पूर्ण करून शासनाकडे अहवाल सादर करणे आवश्यक आहे. कृषी विभागाचे कर्मचारी पंचनाम्याचे काम करत आहेत. मात्र ही सर्व माहिती एकत्र करून तालुका प्रशासनाने जिल्हा प्रशासनाकडे लवकरात लवकर अहवाल सादर करणे गरजेचे आहे. यासंदर्भात कृषी विभागाशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, यापूर्वी ७०० हेक्टर क्षेत्राचा प्राथमिक नुकसान अहवाल प्रशासनाला पाठवण्यात आला आहे. पंचनाम्याचे काम सुरू असून पुढील काही दिवसांत अंतिम अहवाल सादर करण्यात येणार आहे.

# सास्तूर गणातील महिलांशी संवाद, गावातील अडचणी घेतल्या जाणून

लोहारा-लोहारा तालुक्यातील सास्तुर गणाच्या सदस्या प्रगती घोटाळे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महिला संवाद व ग्रामसंवाद या उपक्रमाचे आयोजन केले होते. तालुक्यातील रेबे चिंचोली येथे या उपक्रमाचा समारोप झाला.

मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत प्रगती घोटाळे या पंचायत समिती सदस्या म्हणून निवडून आल्या आहेत. निवडून आल्याबरोबर त्यांनी नागरिकांच्या समस्या अडीअडचणी जाणून घेण्याचा व त्या सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पंचायत समिती सदस्या प्रगती धीरज घोटाळे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महिला संवाद व ग्रामसंवाद या उपक्रमाचे आयोजन केले होते. दि. ३० मार्च रोजी सास्तुर येथून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. गणातील प्रत्येक गावात जाऊन समाज मंदिर, वाडी, वस्ती, सार्वजनिक ठिकाणे आदी ठिकाणी बैठका घेऊन लोकांच्या अडी अडचणी, गावातील समस्या ऐकून घेऊन त्या समस्या येत्या काही दिवसांमध्ये सोडवण्यासाठी पाठपुरावा करत आहेत.

या महिला संवाद व ग्राम संवाद उपक्रमाची सांगता रविवारी (दि.५) चिंचोली रेबे येथे झाली. यावेळी सरपंच गोकुळ मोरे, ओमकार मोरे, नरेंद्र मोरे, दिलीप मोरे, बालेपीर शेख, भरत मोरे, विकास मोरे, पांडुरंग मोरे, प्रदीप पाटील यांच्यासह गावातील नागरिक व महिला उपस्थित होत्या.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# अखेर शस्त्रसंधी

सध्याच्या युगात युद्ध किती भयाण आहे. नाश करणारे आहे हे आता सर्वांनाच कळाले असेल. युद्ध तसे युद्ध करणारा व ज्यांच्याशी युद्ध केले जाते त्या देशाला मोठी किंमत चुकवावी लागते. हे आता कळाले असेल. जवळपास चाळीस दिवसानंतर शस्त्रसंधी होत आहे. अमेरिका-ईस्त्राईल आणि इराण या देशांमधला संघर्ष अखेर थांबला असून दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी जाहिर झाली आहे. दोन्ही देशांनी सैन्य कारवाया दोन आठवड्यांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वेळेनुसार सकाळी पाच वाजल्यानंतर इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याचा आणि इराणला उद्ध्वस्त करण्याचा इशारा दिला होता. मात्र दिलेल्या अल्टिमेटम पूर्वीच इराण आणि अमेरिकेमध्ये दोन आठवड्यांची सशर्त शस्त्रसंधी करण्यात येत असल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. इराणचा दोन आठवडे शस्त्रसंधीचा प्रस्ताव स्वीकारल्याचे ट्रम्प यांनी म्हटले तर हल्ले थांबल्यास आम्हीही युद्ध थांबवू असे इराणचे परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटले आहे. इराणने दिलेला १० अटींचा मसुदा मान्य करण्यासारखा असल्याचे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले. तर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याची अट अमेरिकेने घातली होती ही या अटीला इराणनेदेखील सकारात्मक प्रतिसाद दिला. इराण हॉर्मुझ पूर्णपणे आणि लगेच खुले करायला तयार झाल्याचेही ट्रम्प यांनी सांगितले आहे. दरम्यान, अमेरिकेने इराणसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामास सहमती दर्शवली आहे. इराणवर मोठा हल्ला करण्याची आणि तेथील संपूर्ण संस्कृती नष्ट करण्याची धमकी दिल्यानंतर काही तासांतच डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विधान केले. या युद्धविरामात पाकिस्ताननेही महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उल्लेख ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये केला. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनीही पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल मुनीर यांचे आभार मानले. ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे, मी दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी इराणवरील बॉम्बहल्ले आणि हल्ले थांबवण्यास सहमत आहे. हा द्विपक्षीय युद्धविराम असेल. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार आणि त्यांच्या विनंतीनुसार, रात्री इराणकडे पाठवण्यात येणारी विनाशकारी लष्करी शक्ती थांबविण्यात येत आहे, यात अट अशी आहे की इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे, तात्काळ आणि सुरक्षितपणे उघडण्यास सहमती दर्शवावी. हे करण्यामागचे कारण असे आहे की, सर्व लष्करी उद्दिष्टे आधीच पूर्ण केली आहेत आणि त्याहूनही पुढे गेले आहे, आणि इराणसोबत दीर्घकालीन शांततेसाठी आणि मध्य-पूर्वेतील शांततेसाठी एका ठोस कराराच्या अगदी जवळ आहोत. इराणकडून १०-कलमी प्रस्ताव मिळाला आहे, आता हा वाटाघाटींसाठी हा एक व्यवहार्य आधार आहे. अमेरिका आणि इराण जवळपास सर्व पूर्वीच्या विवादांवर सहमत झाले आहेत असे दिसून येते, परंतु कराराला अंतिम रूप देण्यासाठी आणि तो पूर्ण करण्यासाठी हा दोन आठवड्यांचा कालावधी आवश्यक आहे. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून आणि मध्य-पूर्वेतील राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करत असताना, या दीर्घकाळ चाललेल्या समस्येवर तोडगा काढण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकणे हा सन्मान आहे, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणतात. इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी शस्त्रसंधीच्या अंतिम करारावर प्रतिक्रिया दिली आहे. शस्त्रसंधी हा इराणचा विजय असल्याचे मोजतबा खामेनी यांनी म्हटले आहे. मोजतबा खामेनी यांनी दिलेल्या माहितीनूसार, अंतिम कराराची चर्चा इस्लामाबादमध्ये होणार आहे. मोजतबा यांनीच सर्वोच्च सुरक्षा परिषदेच्या शस्त्रसंधी प्रस्तावाला मंजुरी दिली होती. अमेरिका आणि इराणचे युद्ध १० अटींवर युद्ध थांबले? अहिंसेप्रती कटिबद्धता, होर्मुज सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण कायम राहणार, युरेनियम संवर्धनास परवानगी, सर्व प्राथमिक निर्बंधांची समाप्ती, सर्व दुय्यम निर्बंधांची समाप्ती, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सर्व ठरावांचा अवलंब थांबवणे, गव्हर्नर्स बोर्डच्या सर्व ठरावांचा अवलंब थांबवणे, इराणला नुकसानभरपाई देणे, पश्चिम आशियातील अमेरिकेच्या सैन्याची माघार, लेबनॉनमधील हिझबुल्लाहविरुद्ध युद्धासह सर्व संघर्षांवर युद्धविराम. इराण याने जे तोडीस तोड असे अमेरिकेला उत्तर दिले याला तोड नाही. आज जरी शस्त्रसंधी करण्यात आली असली तरी पुन्हा ट्रम्प इराणच्या नादी लागतील असे वाटत नाही. एकतर होर्मुज खुला करण्यात आला आहे यावर इराणचे वर्चस्व कायम राहाणार आहे. त्यामुळे भारतासाठी मोठी आनंदाची बातमी आहे. आता सहज निर्धोक असी गॅस-इंधनाचे जहाज भारतात दाखल होतील. भारतात जी गॅस बाबत ओरड होती ती कमी होणार आहे. भारताने या प्रसंगी उचललेले पावुल योग्य आहे. भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. मध्यस्थपना केला नाही. जे करायाचे ते गुपीत केल्याने भारत उघडा पडला नाही. भारतात आता आगामी काळात असे संकट निर्माण झाले तर गॅस बाबत पर्याय आता पासून शोधावा लागणार आहे. संकट मोठे आले नाही. त्यामुळे यशस्वी मात केली आहे. आता एक आव्हान म्हणून या संकटाकडे पाहुन उपयोजना करणे अपेक्षित आहे. सौरऊर्जावर चालणारी चुल म्हणजे गॅसची शेगडी निर्माण करावी. सौरऊर्जाचा अधिक वापर केला पाहिजे. तरच गॅस संकटावर मात करणे शक्य होईल. ईराणच्या ताठर भुमिकेमुळे अमेरिकेला युद्धविरामची घोषणा करावी लागली. दुसरा पर्याय नव्हता. एक वैमानिक शोधण्यासाठी मोठे परिश्रम घ्यावे लागले. त्यामुळे काही झाले तरी अमेरिकेची ही माघार म्हणजे ट्रम्प यांचा चुकीचा निर्णयावर शिक्कामोर्तब आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. ट्रम्पला या बाबत अमेरिकेतील जनतेचा विरोध होता. युद्धाची गरज नसताना उचलेले पावुन शस्त्रसंधीमुळे उघड पडला आहे. अखेर शस्त्रसंधी मुळे बऱ्याच बाबी सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

# सकाळच्या या चुकीच्या सवयीं -मुळे वाढतो हार्ट अटॅकचा धोका

## झोपेतून उठताच काय करू नये? तज्ज्ञ काय सांगतात?

सोलापूर शहरातील एका २३ वर्षीय तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. हर्षवर्धन महेश इंगळे, असे या मृत तरुणाचे नाव असून, तो महाविद्यालयीन शिक्षण घेत होता. गुरुवारी पहाटेच्या सुमारास हर्षवर्धनच्या छातीत अचानक तीव्र वेदना सुरू झाल्या होत्या. कुटुंबीयांनी त्याला उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. गेल्या काही वर्षांत तरुणांमध्ये हार्ट अटॅकचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. कमी वयातच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. यापार्श्वभूमीवर सकाळी झोपेतून उठताच हार्ट अटॅकचा धोका कशामुळे वाढतो? नेमकी काय आहेत त्यामागची कारणे? याविषयीचा हा आढावाष्ठ

**हार्ट अटॅकचा धोका कशामुळे वाढतो?**

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, हृदयाला होणारा रक्तपुरवठा थांबल्यानंतर हृदयविकाराचा झटका येण्याची दाट शक्यता असते. काहींना सकाळी ६ ते १० या वेळेत हृदयविकाराचा झटका येतो आणि त्यामागे वेगवेगळी कारणे आहेत. व्हिएन्ना जनरल हॉस्पिटलचे वरिष्ठ हृदयरोग तज्ज्ञ डॉ. हेगल यांनी १२,००० हून अधिक हृदयविकाराच्या प्रकरणांचा सखोल अभ्यास केला. सकाळी झोपेतून उठल्यानंतर पहिल्या १० मिनिटांत हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. कारण- काही जण त्यांच्या दिवसाची सुरुवात व्यायामाने नव्हे, तर ताणतणावाने करतात, असे डॉक्टर हेगल यांनी सांगितले आहे.

**झोपेतून उठताच येऊ शकतो हार्ट अटॅक?**

''झोपेतून उठल्यानंतर अनेकांना मोबाईल बघण्याची सवय असते. यादरम्यान काही ताणतणावाचे संदेश वाचल्यास त्यांचा शरीरावर विपरीत परिणाम होतो. त्यातच सकाळी शरीरातील रक्तदाब सुरळीत सुरू झालेला नसल्याने हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. सकाळी झोपेतून उठताच अचानक कामाला लागल्याने किंवा तणावाला सामोरे गेल्याने कोर्टिसोल हार्मोनसह मज्जासंस्थेवरील ताण वाढतो, ज्यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, असेही डॉक्टर हेगल यांनी स्पष्ट केले आहे.

**हार्ट अटॅकचे प्रमाण कशामुळे वाढलेय?**

अनेक संशोधनांमध्ये पहाटेच्या वेळेत हार्ट अटॅकची प्रकरणे वाढल्याचे दिसून आले आहे. याच वेळेत शरीरात रक्तदाब, हृदयाचे ठोके आणि कॉर्टिसोल (ताण निर्माण करणारे हार्मोन) वाढते. या शारीरिक बदलांमुळे हृदयावरील ताण वाढतो आणि धमन्यांमध्ये अडथळे निर्माण होऊन हृदयविकाराचा धोका वाढण्याची शक्यता वाढते. सकाळी ६ ते १० या वेळेत हृदयविकाराच्या झटक्यांचे प्रमाण सर्वाधिक असते. काही अभ्यासांनुसार हा धोका इतर वेळेच्या तुलनेत ४०म पर्यंत जास्त असतो, असे विविध संशोधनांमधून समोर आले आहे. कॉर्टिसोल हा शरीरात ताण निर्माण करणारा हार्मोन आहे.

**हृदयविकाराच्या झटक्यामागील कारण काय?**

सकाळी कॉर्टिसोल अचानक वाढल्याने हृदयाची गती कमी होऊन हार्ट अटॅक येण्याचा धोका वाढतो. हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांमध्ये जागे झाल्यानंतर काही मिनिटांतच हृदय गतीची परिवर्तनशीलता (कीं%) झपाट्याने घसरल्याचे आढळले. त्यामागील कारण शारीरिक श्रम नसून, मानसिक ताणामुळे वाढलेले कॉर्टिसोल होते, असे डॉ. हेगल यांनी स्पष्ट केले आहे. सकाळी झोपेतून उठल्यानंतर मज्जासंस्था कार्यरत होण्यासाठी किमान पाच मिनिटे लागतात; पण आपण तिला शांततेऐवजी उठता क्षणी ताणतणावात ढकलतो. यादरम्यान काही मिनिटे मोबाईलपासून दूर राहून शांत बसल्यास कॉर्टिसोलच्या धक्क्यापासून बचाव केला जाऊ शकतो, असेही डॉ. हेगल म्हणाले.

**'या' सवयीमुळे वाढतो हृदयविकाराचा झटका**

गाझियाबाद येथील यशोदा रुग्णालयातील वरिष्ठ डॉ. ए. पी. सिंह यांनीदेखील सकाळी झोपेतून उठल्यानंतर पहिल्या १० मिनिटांत हृदयविकाराचा झटका येण्याची कारणे सांगितली आहेत. ''चांगल्या आरोग्यासाठी किमान आठ तास झोप घेणे आवश्यक आहे. झोपेची कमतरता किंवा तिचा खराब दर्जा हृदयावर वाईट परिणाम करू शकतो. सकाळी झोपेतून उठल्यानंतर मोबाईलपासून दूर राहा आणि तणावाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा, चहा किंवा नाश्ता करण्यापूर्वी कोमट पाण्याचे सेवन करा, सकाळची दिनचर्या शक्य तितकी शांत, सौम्य किंवा शरीराला सहजपणे सक्रिय ठेवणारी केल्यास हृदयविकाराचा धोका टाळता येऊ शकतो, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनेच्या माहितीनुसार, हृदयविकाराच्या झटक्याने जगात सर्वाधिक मृत्यू होतात. दरवर्षी जवळपास दोन कोटी लोकांना हार्ट अटॅकने आपले प्राण गमवावे लागतात. यादरम्यान आपण दररोज हृदयाची काळजी घेतली, तर हार्ट अटॅकचा धोका कमी होऊ शकतो, असा सल्ला हृदयरोग तज्ज्ञ देतात. साधारणत: एका निरोगी व्यक्तीच्या हृदयाचे ठोके प्रति मिनीट ६० ते १०० असायला हवेत, असे आरोग्य तज्ज्ञ सांगतात. तसे पाहता, हृदयविकाराचा झटका येण्याआधी शरीरात अनेक लक्षणे दिसतात; पण छातीत अचानकपणे वेदना होणे हे त्याचे सामान्य लक्षण मानले जाते.

**हार्ट अटॅक येण्याआधीच कसा रोखायचा?**


हृदयविकाराचा झटका येण्याआधीच टाळला जाऊ शकतो आणि त्याचे अनेक मार्ग असल्याचा दावाही काही आरोग्य तज्ज्ञांकडून केला जातो. मात्र, त्यासाठी प्रत्येकाने आपले शरीर निरोगी, तसेच सुदृढ ठेवायला हवे, असा सल्लाही ते देतात. हृदयविकाराचा धोका कमी करण्याचा पहिला मार्ग हा संतुलित आहार आणि योग्य व्यायाम असल्याचे सांगितले जाते. या दोन्ही गोष्टींमुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करता येते. हा घटक प्रत्येक व्यक्तीच्या रक्तात आढळतो आणि त्याच्या वाढीमुळे हृदयविकाराचा धोका निर्माण होतो, असे हृदयरोग तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# चैत्रांगण

आपल्या मराठी वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासून होते.हा चैत्र महिना म्हणजे वसंत ऋतुच्या आगमनाचा महिना. या दिवसात वातावरणातील गारवा कमी होऊन उष्णतेला सुरुवात होते. उन्हाळ्यात झाडांची सर्व पाने गळून पडतात. या वसंत ऋतूत झाडाना नवीन पालवी फुटते. कैऱ्या येण्यास सुरुवात होते. प्रतिपदेला गुढी उभी करून नवीन वर्षाचे आनंदात स्वागत केले जाते. मग तृतीयेला चैत्र गौरीचे आगमन होते. तिला थंड चंदन लावले जाते. कैरीची डाळ,थंडगार पन्हे, टरबूज,खरबूज, काकडी,बत्तासे असे सगळे थंड पदार्थ तिला उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून आवर्जून केले जातात. तिला खाण्यासाठी लाडू,करंजी,शेव,शंकरपाळी असे फराळाचे पदार्थ सुद्धा बनवतात. राम नवमी, हनुमान जयंती असे उत्सव सुद्धा याच चैत्र महिन्यात येतात.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षयतृतीयेला आमरस, पुरणपोळी, खीर,कानवला खायला घालून तिची पाठवणी केली जाते. आपल्या संस्कृतीत रंगीबेरंगी रांगोलीला खूप महत्वाचे स्थान आहे.पूर्वी सर्वांची सकाळ दारातील गोमयाने स्वच्छ सारवलेल्या अंगणातील,तुळशीसमोरील, चुलीवरील,उंबरठ्यावर, देवापुढे रांगोळ्या काढण्यापासूनच व्हायची स्त्रियांची.इतके प्रसन्न, मंगलमय वाटते रंगीबेरंगी सुंदर रांगोळ्या पाहून.त्यातून स्त्रियांचे कौशल्य दिसायचे. जितकी रेख बारीक,एकसारखी येते,तितकी रांगोळी आकर्षक दिसते. काही विशिष्ट सणावारांना विशेष रांगोळ्याही काढल्या जातात. जेवणाच्या ताटा भोवती पण सुन्दर रांगोळी काढली जाते,त्यामुळे जेवताना मन प्रसन्न होते.

काही चिन्हे खूप शुभ मानली जातात,ती दररोजही काढली जातात. पूर्वी खेड्यापाड्यातून साप,विंचु ,नाग असे नेहमीच अंगणात, अंधाऱ्या,अडचणीच्या ठिकाणी थंडगार वळचणीला सापडायचे. असे म्हणत,की रांगोळी काढलेली असली की ती ओलांडून त्याला घरात येणे जमत नाही म्हणून त्यांना प्रतिबंध व्हावा म्हणून पण मोठ्या मोठ्या रांगोळ्या काढत असत. चैत्रांगण रांगोळी ही महाराष्ट्रातील चैत्र महिन्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि सांस्कृतिक परंपरा आहे, जी गुढीपाडव्यापासून ते अक्षय्य तृतीयेपर्यंत अंगणात काढली जाते. ही रांगोळी सूर्य, चंद्र, स्वस्तिक, कलश, गोपद्म अशा ३३ शुभचिन्हांनी बनलेली असते, जी घरात सुख, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा आणते,असे मानले जाते. यातून आपली संस्कृती, कला आणि आध्यात्मिकता दिसते.यामध्ये प्रामुख्याने सूर्य-चंद्र, दोन गौरी, स्वस्तिक, कमळ, शंख, चक्र, गदा, पाच कोळ्यांची





सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे.

आकृती (पंचेंद्रिये), तुलसी वृंदावन, कलश, त्रिशूळ इत्यादी चिन्हे काढली जातात. ही रांगोळी घरात चैतन्य पसरवते. यातील प्रतीके वास्तूतील दोष दूर करतात आणि समृद्धी वाढवतात, असे मानले जाते. परंपरा म्हणजे केवळ कला नसून भारतीय संस्कृतीतील निसर्ग आणि देवतेचे स्वागत करण्याचा एक सुंदर मार्ग आहे. 'चैत्रांगण' हा रांगोळी प्रकार कला कौशल्य दर्शवतो त्यामुळे तो वैशिष्ट्यपूर्ण आहे.चौकोनात एका मखरामध्ये दोन गौरी काढतात. त्यांना पार्वती व तिची सखी समजतात. तिच्या दोन बाजूंला सूर्य व चंद्र काढतात. सूर्य हा कायम प्रकाशमान, निसर्गचक्राचा एक अविभाज्य घटक; तर चंद्र शीतल. सूर्य-चंद्रांमुळे ही सृष्टी कायम प्रकाशू दे, असे त्यातून सुचवायचे असावे. देवीच्या बाजूला दोन पंखे उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून आणि मखरात देवीला बसण्यासाठी दोन पाटही काढतात. शंख, चक्र, गदा व पद्म ही देवतांची आयुधे आणि हत्ती, गरुड ही त्यांची वाहनेही त्यात काढली जातात. रांगोळीत गाय, नाग यांना शेतीमुळे महत्त्व तर कासवाप्रमाणे सर्व जाणिवा आत घेऊन नंतर देवदर्शन करावे हे सुचवण्यासाठी त्या जलचरांचाही समावेश होतो. गोपद्मामुळे गायीचे स्मरण आणि हत्ती म्हणजे गजांतलक्ष्मी ऐश्वर्याचे, सामर्थ्याचे प्रतीक. तीक्ष्ण नखे व दृष्टी, धारदार चोच यांच्या सहाय्याने भक्ष्याला अचूक टिपणारा गरुड हे श्रीविष्णूचे वाहन म्हणून ओळखला जातो. स्वस्तिक हेही शुभचिन्ह, ते सात्त्विकता, आनंद व मांगल्य यांचे प्रतीक आहे. म्हणून तर ती शुभचिन्हे चैत्रांगणात समाविष्ट झाली असावीत. 'अज्ञानरूपी चिखलातून कमळ फूलू दे' ही भावना आहे.

या चैत्रांगणात विद्येची देवता सरस्वती, तुळस, वृंदावन, ॐ, आंबा, उंबर, पिंपळ यांबरोबरच कलशही दाखवतात. शुभचिन्ह व धार्मिक कामात कायमच लागणारा नारळही तेथे असतो. रांगोळीत मोर व पोपट हे पक्षी काढतात. गौर चैत्रात महिनाभर घरोघरी बसते. त्यामुळे चैत्रांगणात फणी, करंडा, आरसा,मंगळसूत्र,कंगवा ही सौभाग्यचिन्हे असतात. लक्ष्मीच्या पावलांसोबत पाळणा व तिचे बाळही असते.ते वंशवृद्धीचे प्रतीक आहे. शंकराची त्रिशूळ, डमरू ही वाद्ये, तर त्यांना प्रिय असलेले बेलाचे पान त्यात काढले जाते. अशा प्रतीकरूपी अनेकविध चित्रांनी साकारलेले चैत्रांगण अंगणात शोभून दिसते. उत्साही वातावरणातील वसंतोत्सव चैत्रांगणाने अधिक आनंदी होऊन जातो.पूर्वी लहान मुली,नवीन नवऱ्या लहान वयाच्या असायच्या. त्यांना सकाळी प्रसन्न,आनंदी वाटावे ,वेळ छान जावा,आणि त्यांच्यातील कला सर्वांना दिसावी,मग त्यांचे कौतुक झाले की त्या आनंदी व्हायच्या,म्हणजे साऱ्या घरातील वातावरणच प्रसन्न व्हायचे म्हणून मुलींना रांगोळ्यांची आवड असायची. पण आता काळाप्रमाणेच बरेच बदल घडत आहेत. जीवन,राहणीमान सारेच बदलले आहे.

घरे छोटी आणि फ्लॅट्स झाले. त्यामुळे मोठ्या रांगोळ्या काढायला जागाही नाही,आणि धावपळ, नोकऱ्या, डबे यातून रांगोळी काढण्यासाठी वेळ पण मिळत नाही. त्यामुळे आता दारापुढे अगदी छोटीशी रांगोळी काढली जाते. पाश्चात्य संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाने ते सुद्धा काही ठिकाणी दिसत नाही. पण ज्यांना खरंच आवड आहे,आपली संस्कृती जपण्याची मनापासून इच्छा आहे, संस्कृतीचा अभिमान आहे,त्यांच्यासाठी वेळ नसला तर खूप सोयी झाल्या आहेत. अगदी छोट्या पासून ते मोठ्या रांगोळ्या पर्यंत आता साचे सर्वत्र अगदी सहज आणि स्वस्तात उपलब्ध असतात. त्यामुळे झटपट आणि सुबक,सुरेख,रेखीव, रंगीबेरंगी रांगोळ्या अगदी सहज कोणीही काढू शकतात. आता तरी प्लास्टिकच्या तुकड्यावर फ ेव्हिकॉल लावून काढलेल्या सुरेख आकर्षक आकारातील रांगोळ्याही मिळतात बाजारात. इच्छा असली की मार्ग दिसतोच. लोकांच्या गरजा ओळखून तसे प्रोडक्ट्स बनवून ती बाजारात आणली जातात. त्यामुळे ग्राहक,विक्रेता दोघांचाही फायदा झाल्यामुळे दोघेही खुश होतात. बेरोजगारांना काम,पैसे मिळतात. त्यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होतो. चला मग,काढणार ना तुम्हीही आता चैत्रांगण? आजच्या आधुनिक जीवनशैलीतही ही परंपरा आपल्याला आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवते. चैत्रांगणामुळे लहान मुलांनाही आपल्या संस्कृतीची ओळख होते आणि त्यांच्यात सर्जनशीलतेची जाणीव निर्माण होते. म्हणूनच, आपण सर्वांनी ही सुंदर परंपरा जपून ठेवावी आणि पुढील पिढीकडेही ती प्रेमाने सुपूर्त करावी. चैत्रांगण हा आपल्या संस्कृतीचा एक अनमोल वारसा आहे. त्याचा अभिमान बाळगुन तो कायम जपलाच पाहिजे.

# कर्करोगाच्या रुग्णांना सर्वाधिक हृदरोगाचा धोका; अभ्यासात धक्कादायक माहिती उघड

आजच्या जगात कर्करोग हे केवळ एक शारीरिक आव्हानच नाही तर जीवघेणा आजार देखील मानला जातो. परंतु, अलीकडील वैद्यकीय अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, कर्करोगाच्या पार्श्वभूमीवर विकसित होणारे 'हृदयरोग' रुग्णांसाठी कर्करोगापेक्षाही जास्त धोका निर्माण करतात. कर्करोग बरा करण्यात वैद्यकशास्त्राने मोठी प्रगती केली आहे. कर्करोगाच्या उपचारांमुळे आणि कर्करोगाच्या तीव्रतेमुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांवर गंभीर परिणाम होतो.

जर्नल ऑफ द अमेरिकन हार्ट असोसिएशनमध्ये प्रकाशित झालेल्या अलीकडील अभ्यासानुसार, कर्करोगाच्या रुग्णांना कर्करोगापेक्षा हृदयरोगाने मृत्यू होण्याचा धोका जास्त असतो. तरुण लोक आणि ज्यांना सुरुवातीच्या टप्प्यात कर्करोगाचे निदान झाले आहे त्यांना विशेषत: या हृदयरोगाचा धोका असतो.

कर्करोग आणि हृदयरोग यांच्यातील संबंध: सुमारे ३.८ लाख लोकांवर केलेल्या अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, कर्करोगाचे निदान झालेल्या लोकांमध्ये हृदयरोगाशी संबंधित मृत्यू होण्याची शक्यता २.४६ पट जास्त असते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर्करोगाचे निदान झाल्यानंतर पहिल्या १० वर्षांत हृदयाशी संबंधित परिणाम फारसे लक्षात येत नाहीत. परंतु १० वर्षानंतर, असं दिसून आलं आहे की, कर्करोगाच्या रुग्णांचे हृदयाचे आरोग्य अधिक वेगाने बिघडते आणि कर्करोग नसलेल्या लोकांच्या तुलनेत मृत्यूचे प्रमाण वाढते.

कारण काय आहे? कर्करोगाच्या रुग्णांना हृदयरोग का होतो यामागे काही जैविक कारणे असल्याचे संशोधनातून दिसून आलं.

प्रथिनांमध्ये बदल: कर्करोगामुळे शरीरात जळजळ निर्माण करणाऱ्या प्रथिनांच्या आणि रक्त गोठण्यास नियंत्रित करणाऱ्या प्रथिनांच्या कार्यात बदल होतात.

उपचारांचे दुष्परिणाम: कर्करोगासाठी रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी, कर्करोगाच्या पेशी नष्ट करताना, हृदयाच्या स्नायू आणि रक्तवाहिन्या कमकुवत करतात.

सामान्य घटक: धूम्रपान, उच्च बॉडी मास इंडेक्स (ँघ), उच्च रक्तदाब आणि मधुमेह हे कर्करोग आणि हृदयरोगासाठी सामान्य जोखीम घटक आहेत.

कोणाला जास्त धोका असतो? तरुण आणि लहान वयात कर्करोगाचे निदान झालेल्या लोकांना वृद्ध लोकांपेक्षा हृदयरोग होण्याचा धोका जास्त असतो. अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, विशिष्ट प्रकारचे कर्करोग असलेल्या लोकांना: लिम्फोमा, स्तनाचा कर्करोग आणि डोके आणि मानेचा कर्करोग हृदयरोग होण्याची शक्यता जास्त असते.

सुरक्षित कसं राहायचं? कर्करोगाच्या रुग्ण हृदयाविषयी जागरूक असले पाहिजे. कर्करोगाच्या उपचारानंतरही, हृदय गती आणि रक्तदाब नियमितपणे तपासला पाहिजे. पौष्टिक आहार, व्यायाम आणि धूम्रपान टाळण्याद्वारे हृदयाचे नुकसान ९०म कमी केले जाऊ शकते. रुग्णांवर उपचार करताना, कर्करोग तज्ज्ञांनी त्यांच्या मूत्रपिंडाच्या कार्याचे आणि हार्मोनल बदलांचे निरीक्षण करावे आणि हृदयरोग टाळण्यासाठी औषधे लिहून द्यावीत.

०००००००००००००००००००००००००

# डोळ्यांना खाज सुटतेय? वेळीच लक्ष न दिल्यास गंभीर आजारांना निमंत्रण



डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचे आणि संवेदनशील अवयव आहेत. सध्याच्या धावपळीच्या जीवनात तासन्तास मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्ही स्क्रीनसमोर वेळ घालवणे, बदलणारे हवामान, धूळ आणि वाढते प्रदूषण यांचा डोळ्यांवर अत्यंत वाईट परिणाम होत आहे. यामुळे डोळ्यांत खाज सुटणे, जळजळ होणे, डोळे लाल होणे आणि कोरडेपणा जाणवणे अशा समस्या उद्भवतात.

अनेकदा लोक डोळ्यांच्या लक्षणांना किरकोळ समजून त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा घरगुती उपाय करून पाहतात; परंतु आरोग्य तज्ज्ञांच्या मते, वेळीच लक्ष न दिल्यास या समस्या भविष्यात दृष्टीशी संबंधित गंभीर आजारांना निमंत्रण देऊ शकतात.क्ष्शरश्रींह

डोळ्यांतील खाज आणि जळजळ होण्याची विविध कारणे असू शकतात. यामध्ये ॲलर्जी आणि संसर्ग ही सर्वात सामान्य कारणे आहेत. धूळ, माती, धूर आणि प्रदूषणामुळे डोळ्यांच्या नाजूक थरावर परिणाम होतो, ज्यामुळे डोळे लाल होतात आणि पाणी येते. तसेच, प्रदीर्घ काळ स्क्रीन पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. संसर्गामुळे डोळ्यांत वेदना, जळजळ आणि सूज येण्याची शक्यता असते. सुरुवातीला ही लक्षणे सौम्य वाटू शकतात; परंतु काही दिवसांत आराम न मिळाल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे अनिवार्य ठरते.

दिवसभरात पुरेसे पाणी पिणे आणि संतुलित आहार घेणे डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. आहारात 'व्हिटॅमिन ए' आणि 'ओमेगा-३ फॅटी ॲसिड' युक्त पदार्थांचा समावेश केल्यास डोळ्यांची दृष्टी चांगली राहते. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. हात आणि चेहरा नेहमी स्वच्छ ठेवावा आणि डोळ्यांना वारंवार स्पर्श करणे टाळावे. प्रदूषण किंवा धुळीच्या ठिकाणी जाताना संरक्षक चष्मा वापरावा. डोळ्यांत खाज येत असल्यास ते जोरात चोळू नका, कारण यामुळे कॉर्नियाला इजा होऊन संसर्ग वाढू शकतो.

दोन ते तीन दिवसांत साध्या उपायांनी आराम मिळाला नाही, तर त्वरित नेत्रतज्ज्ञांकडून तपासणी करून घ्यावी. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे 'स्टिरॉइड' युक्त आय ड्रॉप्स वापरणे डोळ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकते. घरगुती उपचार म्हणून गुलाब जल किंवा इतर कोणतेही द्रव पदार्थ थेट डोळ्यांत टाकण्यापूर्वी डॉक्टरांचे मत घेणे सुरक्षित ठरते. वेळेवर केलेली तपासणी आणि योग्य निगा राखल्यास डोळ्यांच्या गंभीर समस्या टाळता येतात. डोळ्यांत सतत कोरडेपणा जाणवत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने 'ल्युब्रिकेटिंग आय ड्रॉप्स'चा वापर करणे फायदेशीर ठरू शकते.

# समृद्धी महामार्ग अपघात : आठ मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांची मदत

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख रूपये

**मुंबई/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर दि. १ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अपघातात आठ महिलांचा मृत्यू झाला. सदर घटनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे एकूण रुपये ४० लाख इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम जिल्हाधिकारी, जालना यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. अपघात जालना शहरालगतच्या कडवंची गावाजवळ सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास घडला. मजुरांना घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनास मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

अपघातात आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला असून पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. जखमींवर जालन्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये लक्ष्मीबाई संतोष मदन, कडुबाई रामदास मदन, ताराबाई गहेनाजी चौधरी, मंगलाबाई प्रकाश सिनगारे, सुमनबाई कचरू अदमाने, अलकाबाई दादाराव अदमाने, मिनाबाई परमेश्वर अदमाने व कांचनबाई प्रकाश अदमाने यांचा समावेश आहे. घटनेची माहिती प्राप्त होताच समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्षामार्फत तात्काळ आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी पाठविण्यात आल्या. रुग्णवाहिका व पोलीस यांच्या समन्वयातून जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासात संबंधित ट्रक चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



समृद्धी महामार्गावर घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी व वेदनादायक असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची तात्काळ दखल घेऊन मृतांच्या कुटुंबीयांना मदत देण्याचे निर्देश दिले आणि त्यानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. शिवाय, जखमींना आवश्यक ती वैद्यकीय मदत तातडीने मिळावी, यासाठीही प्रशासनाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. गरजू नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी बाबत अधिक माहितीसाठी व मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा असे श्री.रामेश्वर नाईक कक्ष प्रमुख मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष यांनी कळविले आहे.

या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

# ९ एप्रिल रोजी सोलापूर स्थानकावर होणाऱ्या सिग्नल कामांमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे धावणाऱ्या गाड्यांवर होणारा परिणाम

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग, गुरुवार दि. ०९.०४.२०२५ रोजी सोलापूर स्थानकावर 'स्टेब्लिंग लाईन १ व २' कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली सिग्नल कामे पार पाडण्याकरिता 'वाहतूक ब्लॉक' (Traffic Block) घेणार आहे. ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे धावणाऱ्या गाड्यांच्या संचलनावर होणारे परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

ब्लॉकचा दिवस आणि दिनांक: गुरुवार, ९ एप्रिल २०२६
ब्लॉकची वेळ: दुपारी ०१:१५ ते सायंकाळी ०६:१५ पर्यंत (५ तास)

मार्गबदल (Diversions)
खालील गाड्या नमूद केलेल्या मार्गांवरून वळवण्यात येतील:

* गाडी क्रमांक ५७६६२ विजापूर-रायचूर पॅसेंजर (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) विजापूर-होटगी-वाडी मार्गे वळवण्यात येईल. (होटगी-सोलापूर-होटगी दरम्यान सेवा उपलब्ध नसेल.)
* गाडी क्रमांक ५७६६१ रायचूर-विजापूर पॅसेंजर (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) वाडी-होटगी-विजापूर मार्गे वळवण्यात येईल. (होटगी-सोलापूर-होटगी दरम्यान सेवा उपलब्ध नसेल.)

नियंत्रण (Regulations)
खालील गाड्यांचे संचलन नमूद केल्याप्रमाणे नियंत्रित (विलंबित) केले जाईल:




* गाडी क्रमांक १८५२० LTT मुंबई-विशाखापट्टणम एक्सप्रेस (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) ३० मिनिटे नियंत्रित केली जाईल.
* गाडी क्रमांक २२८८१ पुणे-भुवनेश्वर सुपरफास्ट एक्सप्रेस (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) ३० मिनिटे नियंत्रित केली जाईल.
* गाडी क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलघुमट एक्सप्रेस (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) ३० मिनिटे नियंत्रित केली जाईल.
* गाडी क्रमांक ११३०१ CSMT मुंबई-KSR बंगळुरू उद्यान एक्सप्रेस (दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) ३० मिनिटे नियंत्रित केली जाईल.
* गाडी क्रमांक १६३८२ कन्याकुमारी-पुणे एक्सप्रेस (दिनांक ०८.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) १ तास १५ मिनिटे नियंत्रित केली जाईल.
* गाडी क्रमांक ११०२० भुवनेश्र्वर-CSMT मुंबई कोणार्क एक्सप्रेस (दिनांक ०८.०४.२०२६ रोजी सुरू होणारा प्रवास) १ तास नियंत्रित केली जाईल.

ही देखभाल पायाभूत सुविधांची देखभाल आणि सुरक्षितता यांसाठी 'ब्लॉक्स' (रेल्वे वाहतूक थांबवण्याचे कालावधी) अत्यंत आवश्यक असतात. यामुळे प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाशी सहकार्य करावे, तसेच या परिणामांची नोंद घेऊन त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, अशी प्रवाशांना विनंती आहे.

## शक्तीपीठ महामार्गाच्या नव्या संरचनेत सिंधुदुर्गमधील १० गावांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला काही भागांतून होणारा शेतकऱ्यांचा तीव्र विरोध लक्षात घेता, राज्य सरकारने या प्रकल्पाच्या आराखड्यात मोठे बदल केले आहेत. नव्या नियोजनानुसार महामार्गाचे सरेखन बदलण्यात आले असून, यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि दोडामार्ग या दोन सीमावर्ती तालुक्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या दोन्ही तालुक्यांतील प्रत्येकी पाच अशा एकूण १० गावांचा समावेश या महामार्गात करण्यात आला आहे. धार्मिक पर्यटनाला चालना देणाऱ्या या महामार्गाचा मूळ आराखडा शेतकऱ्यांच्या जमिनी संपादनाच्या विरोधामुळे वादात सापडला होता. त्यानंतर प्रशासनाने तांत्रिक फेरबदल करून स्थानिकांचा विरोध कमी करण्यासाठी नवीन मार्ग निश्चित केला आहे. नव्या आराखड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि दोडामार्गमधील सीमावर्ती गावांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## कष्ट, सातत्य आणि प्रामाणिकपणा ही यशाची खरी गुरुकिल्ली – डॉ. बेल्लाळे



**लातूर/प्रतिनिधी :** ०६ एप्रिल २०२६ रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, पदव्युत्तर शिक्षणानंतर करिअरसाठी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडा.आवडीचे क्षेत्र असेल तर कामामध्ये सातत्यता राहते आणि सातत्याने यशाचे शिखर गाठता येते.कष्ट करा, प्रामाणिक रहा आणि महाविद्यालयाचे नाव मोठे करा.याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ.टी.एच.मुजावार यांची विशेष उपस्थिती होती. या निरोप समारंभासाठी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदरील निरोप समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती शिंदे यांनी केले,तर कार्यक्रमाची प्रस्तावना पदव्युत्तर समन्वयक प्रा.पाटील एस.डी.यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.महेश करळे यांनी केले.यावेळी अक्षता कलवाले, आरती कलवाले, श्रुती पवार यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी डॉ.डी.डी.ढेरे,प्रा. एस.एस.धुतेकर,प्रा.एस.बी.टेकाळे, प्रा.ए.आर.इंगळे,प्रा.आर.एस.मालू, माधव सूर्यवंशी,अशोक मदने आणि एम.एस्सी.प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या वाढदिवसा निमित्त मातोश्री वृद्धाश्रमात ज्येष्ठांना स्नेह भोजन; जिल्हा बँक कर्मचारी संघटनेचा पुढाकार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहरातील मातोश्री वृद्धाश्रम येथील ज्येष्ठ नागरिकांना कर्मचारी संघाच्या वतीने स्नेहभोजन देण्यात आले यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांच्या हस्ते जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला व त्यांना वाढदिवसाच्या उपस्थित जेष्ठ नागरिकांनी शुभेच्छा दिल्या वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक महिला ,पुरुष यांनी आपले विचार व्यक्त केले तर जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके यांनी कार्यक्रमाची माहिती दिली.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव संचालक संचालक पृथ्वीराज शिरसाठ संचालक मारोती पांडे संचालक अनुप शेळके संचालक राजकुमार पाटील संचालिका सौ स्वयंप्रभा पाटील,प्रभाकर केंद्रे यांच्यासह जिल्हा बँकेचे अधिकारी कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी मातोश्री वृद्धाश्रम येथील अधीक्षक व्यवस्थापक , जेष्ठ नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

## लातूर येथे १० एप्रिल रोजी 'मार्जिन मनी' योजनेबाबत कार्यशाळेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'मार्जिन मनी' योजनेची सविस्तर माहिती देण्यासाठी लातूरमध्ये विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे औचित्य साधून ही कार्यशाळा १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात होईल.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ८ मार्च २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्जिन मनी योजना सुरू केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ९ डिसेंबर २०२० रोजी मार्गदर्शक सूचना निश्रि्चत करण्यात आल्या असून, अधिक माहितीसाठी इच्छुक नागरिक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन शासन निर्णयाचे अवलोकन करू शकतात.

मार्जिन मनी योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून आपले प्रस्ताव ३० एप्रिल २०२६ पूर्वी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर येथे सादर करणे आवश्यक आहे. १० एप्रिल रोजी आयोजित या कार्यशाळेमध्ये जास्तीत जास्त इच्छुक लाभार्थ्यांनी सहभागी होऊन योजनेची माहिती घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## जीपॅट परीक्षेत लातूरच्या दयानंद फार्मसीचा महाराष्ट्रात दबदबा कायम




**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या नॅशनल बोर्ड ऑफ एग्जामिनेशन इन मेडिकल सायन्सेस (छइएचड) द्वारे अखिल भारतीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी अपटीट्युड टेस्ट) परीक्षेत लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल २२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.या उल्लेखनीय निकालामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्रासह देशभरात दयानंद शिक्षण संस्थेचा दबदबा कायम राहिला असून, जीपॅट परीक्षेत लातूर पॅटर्न अधिक दृढ झाला आहे.जीपॅट परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत वार्षिक १,५०,००० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा यासाठी दयानंद शिक्षण संस्थेकडून ऑल इंडिया रँक च्या पहिल्या शंभर मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक प्रथम क्रमांका साठी ११,००० रुपये, द्वितीय साठी ७,००० रुपये, तृतीय साठी ५,००० रुपये, तर इतर यशस्वी विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३,००० रुपये देण्यात येते.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये केंद्रे ओंकार २६२, पवार प्रतीक २३८, शेख सलमान २३६, दिवाण श्रेया २३७, जाधव प्रणिता २३१, सुरवसे श्र्वेता २१९, बिराजदार शीतल २१२, मुंढे परमेश्र्वर २१०, हाके सरिता २०९, कोटलवार दर्शन २०६, क्षीरसागर विशाल २०५, बियाणी श्रद्धा २०४, मसूलदार नुजत १९९, हत्ते महेश १९२, पवार गोपिका १९०, नाईक श्रेया १९०, नरवडे वैष्णवी १८५, पवार अश्र्विनी १८३, वाकळे श्र्वेता १५७, इंगोले योगेश १५६, खरकडे श्र्वेता १४७ आणि सकाळे आकाश१४६ या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.या सर्वांनी राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट गुण मिळवत संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे.

फार्मसी क्षेत्रातही लातूर पॅटर्न निर्माण केल्याबद्दल आणि विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, तसेच प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, जीपॅट विभागप्रमुख डॉ. अर्चना येलमटे आणि सर्व प्राध्यापकवृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## माजी आ. धीरज देशमुख यांचा वाढदिवस रेणापूर शहरासह तालुक्यात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार धीरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी रोजी रेणापूर शहरासह तालुक्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन मोठ्या उत्साहात हा वाढदिवस साजरा करण्यात आला

महाराष्ट्र कॉग्रेस कमिटीचे प्रवक्ते तथा लातुर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन माजी आ. धिरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी तालुका, शहर कॉग्रेस च्या वतीने रेणापूर येथील रेणुकादेवी मंदीरात महाआरती,ग्रामीण रुग्णाल्यात रुग्णांना फळ वाटप,आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, सायगाव येथील दर्ग्याला चादर अर्पन,तसेच ५० टक्के सवलतीच्या दरात एलएडी टिव्ही, सायकल, वॉटर फिल्टर विक्री करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे रेणापूर तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष नितीन मोटेगावकर रेणा चे चेअरमन अनंतराव देशमुख,माजी चेअरमन सर्जे राव मोरे,जिल्हा बॅकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,कृउबा सभापती उमाकांत खलंग्रे,उपसभापती ॲड शेषेराव हाके, माजी सभापती प्रदिप राठोड, धनराज देशमुख, विलास भोसले, नागनाथ कराड, हनमंत पवार, बाळकृष्ण माने, उद्धव जाधव, तात्याराव वाघमारे, अमर वाकडे, राजेसाहेब खाडप , अमरिश भिसे,पंडीत माने,प्रकाश सुर्यवंशी' प्रदिप माने,बाळकृष्ण माने,सचिन मोटेगावकर , बाळकृष्ण खटाळ, भूषण पनुरे, पदमसिंह पाटील, रहिम पठाण,केशव माने,शहाजी पवार, विश्वजीत पाटील, दिग्विजय पाटील, मारुती गायकवाड, महेश खाडप,राज खाडप,कल्याण शाहीर,प्रशांत माने, प्रशांत,घोडके, बालासाहेब पवार, आकाश राठोड, विनोद खंदाडे, रोहित गिरी,कैलास जाधव, दिपक जगदाळे, गोविंद विर,बाळू टमके, अँड. तानाजी कणसे,धनंजय माने, प्रदिप काळ अजय चक्रे, विश्वनाथ कागले, अड.प्रशांत अकनगिरे,संतोष शिंदे,चेतन एकुरके, सुरज वंगाटे,अतुल कातळे,किशोर चक्रे,शिवाजी अकनगिरे यांच्यासह अदि उपस्थित होते.

## धक्कादायक! मित्राने वाढदिवसाला बोलावले नाही, युवकाने संपवले जीवन; मोबाईलवर ठेवले अखरेचे स्टेटस

**बीड/प्रतिनिधी :** जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथे एका २४ वर्षीय तरुणाने मित्रांसोबत झालेल्या वादानंतर आणि वाढदिवसाच्या सेलिब्रेशनला न बोलावल्यामुळे आलेल्या नैराश्यातून विष प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना घडली आहे. महेश उद्धव भणगे असे या आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून, राहत्या घरी विष प्राशन करुन हे टोकाचे पाऊल उचलले. आपल्या जवळच्या मित्राच्या वाढदिवसाला डावलण्यात आल्याने तो गेल्या काही दिवसांपासून प्रचंड नैराश्यात होता. त्यातूनच, त्याने हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी, पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.

महेशने आपल्या घराच्या छतावर पाणी पिण्याच्या तांब्यात विषारी द्रव्य मिसळून प्राशन केले. दुपारी तो एकटाच छतावर झोपायला गेला होता, मात्र बराच वेळ झाला तरी तो खाली न आल्याने रात्री ८ वाजेच्या सुमारास कुटुंबीय त्याला पाहण्यासाठी घराच्या छतावर गेले. त्यावेळी तो बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

आत्महत्येपूर्वी महेशने आपल्या मोबाईलवर ''माझं दुःख कोणाला सांगू, मी एकटा पडलो'' असे हृदयद्रावक स्टेटस ठेवले होते. गेल्या सोमवारी ६ एप्रिल रोजी त्याच्या एका मित्राचा वाढदिवस होता. महेशला यावेळेस मित्रांनी बोलावले नाही आणि त्याला सोडूनच इतरांनी सेलिब्रेशन केले. या घटनेमुळे तो स्वत:ला सावरू शकला नाही. त्यामुळे, दरम्यान तो नैराश्येत गेला आणि त्याने हे टोकाचं पाऊल उचललं. या घटनेने कुंबेफळ गावात हळहळ व्यक्त होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## महामानवाचा महा जयंती महोत्सवात दिव्यांग बांधवासाठी शासकीय योजनांचा माहिती मेळाव्याचे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी)- दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने महामानवाचा महा जयंती महोत्सव सन २०२६ साजरा करण्यात येत आहे,या महोत्सवात प्रहार संघटना व फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समिती धाराशिवच्या वतीने दि.१३ एप्रिल रोजी दिव्यांग बांधवासाठी शासकीय योजनांचा माहिती मेळावा आयोजित केला असुन या मेळाव्यात विस शासकीय कार्यालयाचा सहभाग आहे तर यात आरोग्य शिबीराचे देखील नियोजन केले आहे,या मेळाव्याचे उद्घाटन उपाध्यक्ष मित्र संस्था तथा तुळजापूर आमदार मा.राणाजगजितसिंहजी पाटील,जिल्हाधिकारी डॉ किर्तीजी किरण पुजार साहेब,एसपी रितुजी खोखर,नगर परिषद मुख्याधिकारी निता अंधारे, तहसिलदार मृणाल जाधव सह इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत होणार आहे,तरी आपण सर्वांनी दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या शेजारील फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या नियोजित जागेत उपस्थित राहुन शासकीय योजनांचा माहिती मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष गणेश वाघमारे व सदस्य मयूर काकडे ,समितीचे सर्व पदाधिकारी यांनी

## पोदार प्रेप, धाराशिव येथे शाळेची सुरुवात



धाराशिव (प्रतिनिधी)- पोदार प्रेप, धाराशिव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी २ एप्रिल २०२६ रोजी शाळेची सुरुवात उत्साहात करण्यात आली. या निमित्ताने आयोजित उदघाटन समारंभाचे उदघाटन प्राचार्य वाल्मिक सोमासे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती रेशमा संकपाळ मॅडम तसेच उपप्राचार्य निलेश जाधव सर यांची उपस्थिती लाभली. शाळेत येणाऱ्या लहानग्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी आनंदात व प्रेमळ वातावरणात स्वागत केले. विद्यार्थ्यांना हस्तनिर्मित (हँडमेड) भेटवस्तू देऊन त्यांच्या पहिल्या दिवसाला खास आणि संस्मरणीय बनविण्यात आले.

शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या हसऱ्या चेहऱ्यांनी, उत्साहाने आणि नव्या सुरुवातीच्या आनंदाने उजळून निघाला.

## राज्यासह कर्नाटकातील ४८ संशोधकांची 'आयडियाची कल्पना':उमरगा शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित आयडिया थॉन स्पर्धेत कल्पनाविष्कार

उमरगा (प्रतिनिधी)-शोधनवृत्ती, नवोपक्रमशीलता, सर्जनशील विचार आणि प्रभावी सादरीकरण कौशल्याला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित आयडिया थॉन आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धेत महाराष्ट्रासह कर्नाटकातून ४८ युवक, विद्यार्थी आणि संशोधकांनी सहभाग घेत नवनवीन कल्पना सादर केल्या.

या स्पर्धेत एकूण ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.विविध सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक, संशोधनाधिष्ठित विषयांवरील कल्पक संकल्पना या विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादर केल्या. उमरग्यातील येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात इनकुबेशन सेंटर फॉर अत्रप्रीनर करिअर कट्टा अन ईएनएसआयएन फोरम पुणे यांच्या विद्यमाने आयडिया थॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे परीक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसर धाराशिव मॅनेजमेंट सायन्स विभागाचे डॉ विक्रम शिंदे, डॉ. सचिन बसैया, संजय जगताप यांनी केले. प्राचार्य डॉ संजय अस्वले हे बक्षीस वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. या स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य डॉ. अस्वले, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, संजय जगताप यांच्या हस्ते रोख रक्कम, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. करिअर कट्टा समन्वयक डॉ. एस पी. पसरकल्ले यांनी सूत्रसंचालन केले.

नवकल्पना मांडण्याचे संशोधकांसाठी मोठे व्यासपीठ या वेळी प्राचार्य डॉ. अस्वले म्हणाले, स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले विचार, संशोधनाधिष्ठित संकल्पना आणि नवकल्पना मांडण्याचे प्रभावी व्यासपीठ मिळाले. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संशोधनाभिमुखता, उद्योजकतेची प्रेरणा निर्माण होते.

## अंधश्रद्धा पूर्ण पूजा-अर्चांचा राजकारणात वाढता आधार:धाराशिव येथे राजकारणातील अंधश्रद्धेवर ॲड.असीम सरोदे यांचा प्रहार

तामलवाडी(प्रतिनिधी)-कायदा आणि राजकारणातील वाढत्या अंधश्रद्धावादी प्रवृत्तीवर कठोर शब्दांत प्रहार करत, अशोक खरात प्रकरणात सामील असलेल्या सर्व राजकीय नेत्यांची नावे जाहीर झाली पाहिजेत, अशी ठाम भूमिका असीम सरोदे यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. शुक्रवार, ३ एप्रिल रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, धाराशिव येथे कायदा व राजकारणातील भोंदूगिरी या विषयावर हे व्याख्यान पार पडले. आपल्या भाषणात सरोदे यांनी सांगितले की, समाजमान्यता मिळवण्यासाठी अनेक राजकीय व्यक्ती अंधश्रद्धा पूर्ण पूजा-अर्चा, होम-हवन यांसारख्या गोष्टींचा आधार घेतात. ही प्रवृत्ती केवळ राजकारणापुरती मर्यादित नसून न्यायालयीन व्यवस्थेतही काही ठिकाणी धार्मिक विधी होत असल्याचे त्यांनी नमूद केले, जे अत्यंत चुकीचे असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजकांच्या वतीने ॲड. रवींद्र मैंदाड व ॲड. देवीदास वडगावकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रस्तावना व पाहुण्यांचा परिचय डॉ. अस्मिता बालगांवकर यांनी करून दिला. विचारमंचावर उपस्थित ज्येष्ठ अभ्यासक ड. राज कुलकर्णी यांनी सध्याच्या राजकारणातील अंधश्रद्धेवर भाष्य केले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सहभागी होण्यासाठी अनेक तरुणांनी पुढाकार घेत अंनिसकडे नोंदणी केली, ही या कार्यक्रमाची विशेष उल्लेखनीय बाब ठरली.

या कार्यक्रमाला नानासाहेब पाटील, एम.डी. देशमुख, आमदार कैलास पाटील, रवींद्र केसकर, संतोष करवर, लोमटे सर, रवी डोईफोडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.आभार चंद्रकांत उळेकर गुरुजी यांनी मानले. कायदेशीर कारवाई करणे आवश्यक अंधश्रद्धेविरोधी कायदा अस्तित्वात असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करण्याचे आदेश असूनही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. अशा परिस्थितीत नागरिकांनी पुढाकार घेऊन अंधश्रद्धाविरोधात तक्रारी दाखल करणे व कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी आवाहन केले. अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या प्रकरणात सुमारे ३९ राजकीय नेते सहभागी असण्याची शक्यता आहे आणि त्यांची नावे पारदर्शकपणे समोर आली पाहिजेत. तसेच मुख्यमंत्र्यांनी जनतेची दिशाभूल न करता भारतीय संविधानानुसार वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्याची जबाबदारी पार पाडावी, असेही ॲड.असिम सरोदे यांनी स्पष्ट केले.

# शिवशंभू सोशल फाउंडेशनचा भव्य उपक्रम; होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हजारो महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**जळकोट (विजय पिसे)-** तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील शिवशंभू सोशल फाउंडेशन आयोजित भव्य होम मिनिस्टर खेळ पैठणी हा बहुचर्चित आणि उत्साहवर्धक कार्यक्रम जळकोट नगरीत अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात पार पडला. गावातील महिलांनी या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद देत उपस्थिती लावली, ज्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाचे सादरीकरण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध निवेदक भारत मुढे (मंगळवेढा) यांनी आपल्या खास शैलीत केले. त्यांच्या प्रभावी निवेदनामुळे कार्यक्रमाला एक वेगळाच रंग चढला आणि उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना दाद दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सुनीता पाटील,महादेवी रेणुके,सुवर्णा गंगणे, कविता भोगे, उषा गंगणे, सुमित्रा पवार,क्षितिजा पाटील, दामिनी कदम, उज्वला पवार, वैष्णवी हत्ते, सोनाली कदम या महिला मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, माता सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या पूजन सोहळ्यामुळे कार्यक्रमाला एक संस्कारमय आणि प्रेरणादायी दिशा मिळाली.

यानंतर गावासाठी व समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचा शिवशंभू सोशल फाउंडेशनच्या वतीने शाल, श्रीफळ व मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. समाजातील या स्तंभांचे कौतुक करत उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरले ते जळकोट येथील दयानंद साखरे यांच्या कन्या साक्षी साखरे हिच्या आईचा करण्यात आलेला सत्कार. साक्षी साखरे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिच्या आईचा सन्मान करून एक प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवण्यात आले.

यानंतर गावातील काही महिलांनी आपल्या भावना व्यक्त करत मनोगत मांडले. त्यांनी अशा कार्यक्रमांमुळे महिलांना एकत्र येण्याची आणि आनंद व्यक्त करण्याची संधी मिळते, असे सांगितले.

मुख्य होम मिनिस्टर खेळ पैठणी कार्यक्रमाला सुरुवात होताच वातावरण आणखी रंगले. विविध खेळ, हास्यविनोद आणि उत्साहाच्या वातावरणात महिलांनी मनसोक्त आनंद लुटला. हजारो महिलांच्या उपस्थितीत शेकडो महिलांनी सहभाग घेत या खेळाचा आनंद घेतला.

स्पर्धेतील विजेत्यांनी आपली छाप उमटवत पुढीलप्रमाणे यश संपादन केले.. प्रथम बक्षीस (मानाची पैठणी) - मीरा कांबळे द्वितीय बक्षीस - अश्विनी भोसले तृतीय बक्षीस - नेहा अंगुले चतुर्थ बक्षीस - भाग्यश्री जाधव पाचवे बक्षीस - रूपाली भोसले

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवशंभू सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास पाटील,सुदर्शन पवार,रोहित शिंदे, प्रसाद हत्ते,अनिरुद्ध कदम, विश्वास भोगे,ओंकार पाटील,ओंकार इगवे,सुशांत गंगणे,अजय गंगणे व इतर सर्व मित्र परिवार सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमात वेळोवेळी सहकार्य करणारे माऊली मंडप चे मनोज सावंत यांचेही विशेष योगदान लाभले.

एकूणच, होम मिनिस्टर खेळ पैठणी हा कार्यक्रम केवळ एक स्पर्धा न राहता महिलांच्या आनंदाचा, एकतेचा आणि सन्मानाचा उत्सव ठरला. जळकोट नगरीत हा कार्यक्रम दीर्घकाळ स्मरणात राहील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## वाखरवाडीतील केळी बागा आडव्या, पंचनाम्याचे आठवड्यानंतर दिले आदेश



ढोकी-धाराशिव तालुक्यातील ढोकी परिसरातील वाखरवाडी शिवारातील गेल्या आठवड्यात अवकाळीने फळबागा, पिकांचे नुकसान झाले. बागा आडव्या झाल्या. मात्र आठ दिवसांनंतर प्रशासनाचे डोळे उघडले. आंबा, केळीसह सर्वच पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी तहसीलदारांना दिले आहेत. या अवकाळीत केळी आणि आंबा उत्पादकांचे सर्वाधिक नुकसान झाले असले तरी अन्य फळबागा व पिकांनाही फटका बसला आहे. तब्बल सात दिवसांनंतर पंचनाम्याचे आदेश दिले आहेत. लवकरात लवकर पंचनामे होऊन नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली. मात्र अद्यापपर्यंत ना प्रशासकीय अधिकारी आले ना लोकप्रतिनिधींना ही वाट दिसली, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

धाराशिव तालुक्यातील ढोकी व परिसरात गेल्या सप्ताहात झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने शेती पिकाचे व फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिसरातील वाखरवाडी शिवारात केळी व अंबा बागायतदारांचे कंबरडे मोडले आहे. वाखरवाडीतील महिला शेतकरी कमलबाई ज्ञानोबा शिंदे यांनी आपल्या तीन एकर केळीची बाग आडवी झाली. आतापर्यंत ३ लाख ७० हजार रुपये खर्च केला. मात्र, वादळी वाऱ्यामुळे केळीची पूर्ण बाग उद्ध्वस्त झाली आहे. व्यापारी आता खरेदी करण्यास नकार देत आहेत. त्यामुळे आता ही उभी बाग मोडून टाकण्याशिवाय कमलबाई शिंदे यांच्या समोर कोणताही पर्याय उरलेला नाही. यासोबतच वाखरवाडी येथील अनंत जाधव, ताईराज जाधव या शेतकऱ्यांचे एक हेक्टर केळीचे नुकसान झाले आहे. अजित लाकाळ व अंकुश शिंदे यांच्या आंबा बागांना मोठा फटका बसला. अवकाळीत गहू, ज्वारी, कांदा, उशिरा लागवड केलेला हरभरा यासोबतच ऊस या पिकाच मोठा फटका बसला आहे. प्रशासनाने तत्काळ या भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ठोस मदत जाहीर करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

बांधावरील झाडांचेही व्हावेत पंचनामे : अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर आंबा आणि इतर फळझाडे लावून उत्पन्नाचा स्रोत निर्माण केला आहे. वादळी पावसाने या बांधावरील झाडांचेही मोठे नुकसान झाले असून फळगळती मोठ्या प्रमाणात झाली आहे. बांधावरील झाडांच्या नुकसानीचे पंचनामे केले जात नाही. त्यांचाही पंचनामा करण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. बांधावरही मोठ्या प्रमाणात झाडे असतात. त्यामुळे तशा झाडांचाही पंचनामा व्हावा.

## जुगार विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान उमरगा पोलीसांनी दि.०७.०४.२०२६ रोजी १ उमरगा पोलीस ठाणे हद्दीत तलाठी कार्यालयसमोर रोडवर झाडा खाली मोकळ्याजागेत मुळज येथे छापा टाकला. यावेळी आनंद वय २९ वर्षे, रा.दहिसर ईस्टकोकणीपाडा कोकणी जि. ठाणे ह.मु. कुंभार पट्टी उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे १६.१५ वा. सु. तलाठी कार्यालयसमोर रोडवर झाडा खाली मोकळ्याजागेत मुळज येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ४५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत. या बाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649